# बृ. मंडळ आयोजित, संजय उपाध्ये यांचा प्रभावी कार्यक्रम 'गप्पाष्टक'



भारतात दूरदर्शनचा प्रसार एवढा झाला आहे तरी 'स्टँड अप कॉमेडी' हा प्रकार फारच थोडेजण करताना दिसतात पूर्वी हिंदीतील कवि विनोदी कवितांची संमेलने भरवित. मराठीत विनोदी एकपात्री कार्यक्रम पु. लं. नी लोकप्रिय केले पण अमेरिकेसारखी 'स्टँड अप कॉमेडी' भारतात सर्रास दिसत नाही. त्याला भारतीय राज्यकर्त्यांना विनोद पचविता येत नाही असे कारण सुद्धा असू शकेल. स्टँड अप कॉमेडीला तर मटेरियल पुरवायला राजकारणाशिवाय विषय नाही. राज्यकर्तेच काय एकूणच भारतीयाला स्वतःची टिंगल रूचत नाही. दादा कोंडके 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यात राजकारण्यांवर आडून हल्ला चढवत. 'सुंदरा मनामधे भरली' या अमेरिकेत बसविलेल्या लोकनाट्याचे प्रयोग महाराष्ट्रात होत तेव्हां त्यातील सूत्रधार राजकारण्यांची नाव घेऊ(शिवसेनाप्रमुख सुद्धा) गंमत करीत. तो धीटपणा तेथील प्रेक्षकांच्या लक्षात येत असे व तुम्ही अमेरिकेतून आलात म्हणून येथील राजकारणी ते खपवून घेतात असे ते म्हणत. येथील नट जर असेच बोलले तर दुसऱ्या दिवशी दंगेधोपे नक्की होतील असे त्यांना वाटे. भारतात घडलेल्या अनेक घटना त्यांच्या समजाला पुष्टी देतात.

मात्र अमेरिकेत जॉनी कार्सन, जे लेनो, लेटरमन, जॉन स्टुअर्ट, बिल कॉसबी, जॉर्ज कार्लिन, बिल मेअर अशी अनेक नावे 'स्टँड अप कॉमिक्स' म्हणून सांगितली जातील. हे सर्वजण राजकारण्यांबरोबर सामाजिक जीवनातील चालीरितींवर, मनुष्य स्वभावावर विनोदाच्या माध्यमातून टीका करीत समाज सुधारण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या कार्यक्रमांना ठराविक विषय नसतो. एका विषयावरून दुसऱ्यावर ते सहज उडी मारतात. संजय उपाध्ये यांचा 'गप्पाष्टक' हा कार्यक्रम या प्रकारात मोडणारा आहे. फरक एवढ़ाच की या कार्यक्रमाचा चार घटका करमणूक करणे एवढ़ाच उद्देश नसून श्रोत्याला विचार करायला उत्तेजित करून त्याच्या वागणूकीत कायम स्वरूपाचा बदल करण्याचा प्रामाणिक प्रयत्न येथे केलेला दिसतो. त्यामुळे या कार्यक्रमाचे मूल्य अधिक आहे.

भारतीय समाजाला देशप्रेम नाही, भारताच्या इतिहासाचा अभिमान नाही, भारतीय संस्कृती म्हणजे काय हे जाणून घेण्याची इच्छा नाही असे संजय उपाध्ये यांना वाटले. समाज चुकीच्या मार्गाने चालला आहे व आपण काही करू शकत नाही याचा मानसिक उद्वेग त्यांना होत होता. म्हणून १९९५ साली कॅनरा बँकेतील नोकरी सोडून 'गप्पाष्टक' कार्यक्रमाद्वारे समाजाचे कुठे चुकते हे विनोदी पद्धतीने सांगण्यास त्यांनी सुरूवात केली. त्यातील विनोद लोकांचे लक्ष वेधून घेण्यास ते वापरतात आणि लोकशिक्षण स्वरचित कवितेच्या माध्यमातून करतात.

उपाध्ये यांची सादरीकरणाची शैली फार उत्तम आहे. भाषा ओघवी आहे. त्यात नाट्य आहे. काव्य रचनेचे गुण अंगी असल्याने छोट्या काव्यातून ते संदेश देतात त्यामुळे ती भाषणबाजी न वाटता प्रेक्षकांना विचार करण्यास उद्युक्त करते. शिवाजीराव भोसले, अविनाश धर्माधिकारी, राम शेवाळकर, बाबासाहेब पुरंदरे हे भारताचा इतिहास एक विषय घेऊन सांगतात. संजय उपाध्ये मात्र जाता जाता इतिहासातील उदाहरणे देतात. विनोद हा कार्यक्रमाचा मूळ पाया असल्याने कोणीही त्यात सहज रंगून जाते. सर्वसामान्यांना आवडतील पण शिक्षित लोकांना ते 'पीजे' वाटतील असेही कांही विनोद त्यांच्या निवेदनात आहेत (उदा. अत्रे आज हयात असते आणि ते बिहारला गेले असते तर त्यांनी काय विनोद केला असता ?...रबडीचा भाव काय?). पण त्याच्याच जोडीला खेळाच्या पत्त्यातील १३ पानांचा अर्थ ते स्वरचित काव्यातून फार मार्मिकतेने सांगून जातात.

जेव्हां सामान्य माणूस शासनाकडून जगण्याची घेतो मुभा<br>
तेव्हां हुकुमशहा नाक्यावर असतो उभा

अशा प्रकारच्या काव्यपंक्ती कार्यक्रमात ठिकठिकाणी ऐकायला मिळतात.

वॉशिंग्टनच्या मयूर देवल यांनी उपाध्ये यांचा कार्यक्रम भारतात ऐकला आणि त्यांना अमेरिकेच्या दौऱ्यावर आणायचेच असे ठरविले. बृ. मंडळाने हा दौरा आयोजित करण्यास मदतीचा हात पुढे केला. गायक, वादक, नाटके यांचे दौरे नेहमीच होतात. पण 'गप्पाष्टक' सारख्या कार्यक्रमाचा दौरा आयोजित करून बृ. मंडळाने एक उत्तम सामाजिक कार्य केले आहे असेच म्हणावे लागेल. आपल्या शहरात हा कार्यक्रम होईल तेव्हां जरूर उपस्थित रहा.

**मोहन रानडे**
editorbmm@yahoo.com